<u>रामटेक तिर्थक्षेत्र विकास आराखडा</u>
पहिल्या टप्प्यातील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमयुएन-२०१८/प्र.क्र.२९९/नवि-१८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - २१.०५.२०१८

<u>प्रस्तावना -</u>

नागपूर जिल्हयातील ऐतिहासिक परिसर असलेल्या रामटेक तिर्थक्षेत्र येथे भेट देणाऱ्या पर्यटकांना/भक्तांना तिर्थक्षेत्र परिसरात मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आणि सदर परिसराचा विकास करण्यासाठी येथील यात्री निवास, प्राचीन मंदिरे, स्मारके, तलाव, विहिरी इ. क्षेत्राचा विकास करणे आवश्यक आहे. रामटेक तिर्थक्षेत्राचे पुरातन महत्व आणि प्राचीन संस्कृती इत्यादी जतन करण्यासाठी रामटेक तिर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करुन त्याद्वारे सदर परिसराचा विकास करण्याची बाब शासनाने हाती घेतली आहे. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९.०६.२०१७ रोजी झालेल्या उच्चधिकार समितीच्या बैठकीमध्ये रु.१५० कोटी (अधिकतम मर्यादेत) रामटेक तिर्थक्षेत्र विकास आराखड्यास तत्वत: मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली. मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने दि.१४.०७.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये, मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने केलेली शिफारस विचारात घेऊन रामटेक तिर्थक्षेत्र विकास आराखड्यास तत्वत: मान्यता दिली व सदर आराखड्याच्या अंमलबजावणीचा कालावधी तीन वर्षाचा निश्चित केला. या आराखड्यातील एकूण कामांपैकी पहिल्या टप्प्यात स्थायी विकासार्थ आवश्यकता असलेल्या कामांची निवड जिल्हाधिकारी, नागपूर प्रधान सचिव (नवि-२) यांच्याकडे सादरीकरण करुन निश्चित करावी, पहिल्या टप्प्यात रु. ५० कोटीच्या कमाल मर्यादेपर्यंत खर्चासाठी निधी निश्चित करावा, असे निदेश शिखर समितीने दिले होते. शिखर समितीच्या निदेशानुसार रु. ५० कोटीच्या कमाल मर्यादेत पहिल्या टप्पयात करावयाच्या रु. ४९.२८ कोटी एवढ्या कामांची निश्चिती प्रधान सचिव (नवि-२) यांच्याकडे झालेल्या सादरकीरणानंतर निश्चित करण्यात आली आहे. या पहिल्या टप्प्यातील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय-</u>

नागपूर जिल्ह्यातील रामटेक या तिर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी, येथील ऐतिहासिक स्मारकांचा आणि परिसराचा विकास करण्यासाठी रु.१५० कोटीच्या रामटेक तिर्थक्षेत्र विकास आराखडयास शासनाने तत्वत: सहमती दिली आहे. या आराखड्याच्या पहिल्या टप्प्यात करावयाच्या निश्चित केलेल्या रु. ४९.२८ कोटी रकमेच्या कामांना या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्याबाबतचा तपशील आणि अटी/शर्ती खालीलप्रमाणे राहतील :-

१) रामटेक तिर्थक्षेत्र विकास आराखडयाच्या पहिल्या टप्प्यात करावयाच्या एकूण रु. ४९.२८ कोटीच्या कामाची यादी आणि त्याबाबतची अंमलबजावणी यंत्रणा सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ आणि ब प्रमाणे असतील.

२) प्रस्तुत प्रकल्प राबविण्यापूर्वी सदरहू आराखडयातील प्रत्येक कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकांना सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मान्यता घेण्यात यावी.

३) प्रस्ततु प्रकल्प राबविण्यापूर्वी पर्यावरणीयदृष्टया आवश्यक त्या सक्षम प्राधिकरणाकडून आवश्यक ती मान्यता घेण्यात यावी.

४) आराखड्याची अंमलबजावणी करतांना शिखर समितीच्या मान्यतेशिवाय मंजूर आराखड्या व्यतिरिक्त कोणतेही नविन काम त्यात समाविष्ट करता येणार नाही.

५) या प्रकल्पासाठी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या निधीच्या खर्चाबाबत या विभागाने तसेच वित्त विभाग व नियोजन विभागाने वेळोवेळी शासन परिपत्रकान्वये/शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांचे अंमलबजावणी यंत्रणांनी पालन करावे.

६) या प्रकल्पासाठी होणाऱ्या शासकीय खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे विहित कालमर्यादेत शासनास सादर करण्यात यावे.

७) या शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीच्या नियोजनानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

८) सदरहू खर्च हा खर्चाची नवीन बाब असल्याने, याबाबत नवीन लेखाशीर्ष उघडणे व त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करणे व या नवीन लेखाशीर्षा खालील उपलब्ध होणाऱ्या तरतूदीनुसार आवश्यक त्या खात्रीनंतर व विहित मान्यतेनंतर वेळोवेळी निधी वितरित करण्याची जबाबदारी नगर विकास विभागाकडील कार्यासन नवि-१६ ची राहील.

९) सदर विकास आराखडयाच्या कामाचे समन्वयन जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे राहील. त्यानुसार जिल्हाधिकारी, नागपूर यांनी शासनाने रामटेक तिर्थक्षेत्र विकास आराखडयासाठी उपलब्ध करुन दिलेले सहायक अनुदान रकमा संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना वितरित करणे, त्यांच्यावर देखरेख ठेवणे आणि वेळोवेळी कामाचा आढावा घेणे याबाबतचे संनियंत्रण करतील.

१०) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प), नागपूर हे या आराखडयातील कामांच्या तांत्रिक पर्यवेक्षणासाठी नोडल यंत्रणा म्हणून जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या देखरेखी खाली काम पाहतील.

११) शासनाने ज्या प्रयोजनासाठी रक्कम मंजूर केली आहे त्याच प्रयोजनासाठी रक्कम खर्च होईल याची संबंधित अंमलबजावणी यंत्रणाने दक्षता घ्यावी.

१२) सदर आराखड्याच्या अंमलबजावणी संदर्भात प्रकल्प सल्लागाराच्या नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे. नियोजन विभागाच्या दि.१९.०७.२०१६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार प्रकल्प सल्लागारास शुल्क अदा करताना ते टक्केवारी स्वरुपात न देता ठोक व वाजवी देण्यात यावे. तथापि, सदरचे शुल्क

एकूण प्रकल्प किमंतीच्या ३ टक्केपेक्षा जास्त होणार नाही, याची जिल्हाधिकारी, नागपूर यांनी काळजी घ्यावी.

२. सदरचा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व त्यांच्याकडील अनौपचारिक संदर्भ क्र.१५६/ए.सी.एस./का.१४४४, दि.०८.०५.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२११४५८२२९४२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish J Moghe

Digitally signed by Satish J Moghe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6230073c6c2b69dbf76e5210974f85eec0496e45eb4319228925521689fc99e6, cn=Satish J Moghe
Date: 2018.05.21 14:58:40 +05'30'

(स.ज.मोघे)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.मंत्री (वित्त,नियोजन व वने), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.मंत्री (ऊर्जा, नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क), तथा पालकमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. नागपूर जिल्ह्यातील संबंधित संसद सदस्य, विधानसभा व विधानपरिषद सदस्य
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव- वित्त विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग/नियोजन विभाग/वन विभाग/पर्यटन विभाग/सांस्कृतिक कार्य विभाग
८. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
१०. जिल्हाधिकारी, नागपूर
११. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, नागपूर
१२. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प), नागपूर
१३. सहायक संचालक, नगररचना, नागपूर
१४. सहायक संचालक, पुरातत्व विभाग, नागपूर
१५. प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, नागपूर
१६. मुख्य वन संरक्षक, नागपूर
१७. उप वनसंरक्षक (वने), नागपूर
१८. भारतीय पुरातत्व विभाग, २ रा माळा, पुरातत्व भवन,बंगला नं.११, सेमिनार हिल्स, नागपूर
१९. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपरिषद प्रशासन, नागपूर
२०. मुख्याधिकारी, रामटेक नगरपरिषद, जि. नागपूर
२१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
२२. निवडनस्ती (नवि-१८)

<u>परिशिष्ट-अ</u>

हेरीटेज अंबाला तलावाचा परिसर विकास

अ.क्र.	कामे	अमंलबजावणी यंत्रणा	रक्कम कोटीत
१	ऐतिहासिक स्मारकाचे माहिती फलक व परिसरातील दिशादर्शक फलक लावणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	०.५०
२	घाट व निवडलल्या जागी पाथवेमार्गातील फर्निचरर्स व इतर जनसुविधा	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	०.८०
३	अंबाला तलाव परिसरामध्ये पुरातत्व वास्तुला शोभेसे पथदिवे लावणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	०.२०
४	नारायण टेकडी प्रवेशव्दारापासून अस्तित्वात असलेल्या रोडपर्यंत ५०० मी. डांबरीकरण करणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	०.३०
५	गणेश मंदीर, दगडी महल ते मोक्षधाम पर्यंत दगडीपथमार्ग व बंदीस्त भुमीगत गटारांचे बांधकाम करणे	रामटेक नगरपालिका	०.५०
६	नारायण टेकडी येथील प्रवेशव्दाराचे बांधकाम करणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	०.३०
७	इमारतींचा जिर्णोध्दार (२५ इमारती) : झाडे झुडपे स्वच्छ करणे, परिसरातील अनुचित बाबी नष्ट करणे, ऐतिहासिक वास्तुच्या साजेशे परिसर विकास करणे, जुने रंग काढून नव्याने रंगसफेदी करणे व लॅंडस्केपिंग करणे, पुरातत्व दगडांची स्वच्छता व पुन:स्थापना करणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	४.३३
८	अंबाला तलावास जोडलेल्या जुन्या मल:निस्सारण वाहिनी बंद करणे, वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्ट व सिवेज ट्रिटमेंट प्लॅन्टला मल:निस्सारण व जलनिस्सारण वाहिनींची भुमिगत जोडणी करणे व ऐतिहासिक स्मारक परिसराला भुमिगत वाहिनींची जोडणी करणे	रामटेक नगरपालिका	३.००
९	अंबाला खिंडसी तलावाभोवती तारेचे कुपण करणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	०.५३
१०	अस्थिविसर्जन कुंडाजवळ सार्वजनिक स्थानगृह, शौचालय व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	१.००
११	अंबाला तलावास जोडल्या गेलेल्या नैसर्गिक पाझरांची गाळ काढून स्वच्छता करणे	रामटेक नगरपालिका	०.३०

१२	वसाहतीतील वादळी पावसाच्या पाण्याच्या निचरा करणाऱ्या नाल्यांची स्वच्छता करणे	रामटेक नगरपालिका	०.२०
१३	गंगासुत्र परिसर पुनर्विकसित करणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	०.७५
१४	३ व ४ क्रमांकाच्या छत्रीजवळ सुशोभिकरण व पर्यावरण सुधारणा करणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	०.५०
१५	पंचाक्षरी मंदीर ते छत्री क्र.१९ पर्यंत पर्यावरण सुशेभिकरण करणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	१.००
१६	अंबाला जवळील अस्थिकुंडाचे अद्यावतीकरण करणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	०.५०
१७	अस्थिकुंडाच्या पुर्वेकडील घाटाचे चरमकर घाटापर्यंत जिर्णोध्दार करणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	२.००
१८	नारायण टेकडीजवळ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे	रामटेक नगरपालिका	०.५०
१९	अंबाला तलावाजवळील राम उद्यानात शौचालय व स्थानगृहाची व्यवस्था करणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	४.००
२०	खाक चौक ते अंबाला प्रवेशव्दार परिसरात मल:निसारण सयंत्र बसविणे, मल:निस्सारण वाहिनी बांधकाम, सेप्टीक टँक बांधकाम करून इश्वर देशमुख कॉलेजकडे वळता करणे	रामटेक नगरपालिका	२.००
२१	मौक्षधाम व अंत्यसंस्कार परिसराचा विकास करणे	रामटेक नगरपालिका	१.००
२२	निनावी छत्री शिवमंदीर, क्र. ८, शिवमंदीर क्र.१७ आणि गंगासुत्र मंदीराच्या मुख्य इमारतीचे जिर्णोध्दार करणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	३.००
	एकूण परिशिष्ट-अ		**२७.२१**

Satish J Moghe

Digitally signed by Satish J Moghe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6230073c6c2b69dbf76e5210974f85eec0496e45eb4319228925521689fc99e6, cn=Satish J Moghe
Date: 2018.05.21 14:58:52 +05'30'

(स.ज.मोघे)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

<u>परिशिष्ट-ब</u>

हेरीटेज गडमंदिर व रामटेक परिसराचा विकास

अ.क्र.	कामे	अमंलबजावणी यंत्रणा	रक्कम कोटीत
१	ऐतिहासिक स्मारकाचे माहिती फलक व परिसरातील दिशादर्शक फलक लावणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	०.५०
२	घाट तथा गडमंदीराच्या व निवडलेल्या जागी पाथवेमार्गातील फर्निचर व इतर जनसुविधा करणे	रामटेक नगरपालिका	०.८०
३	गडमंदीर परिसरामध्ये पुरातत्व वास्तुला शोभेसे पथदिवे लावणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	०.४५
४	हरिण उद्यान (डीअर पार्क) ते ओम उद्यान येथे जनसुविधा व माहिती दर्शक फलक लावणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	०.२०
५	विविध ठिकाणी प्रवेशव्दाराचे बांधकाम करणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	१.५०
६	अनावश्यक तसेच मोडकळीस आलेल्या गडमंदीर परिसरातील वास्तु जमिन दोस्त करणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	०.१५
७	महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे अतिथीगृहाजवळ योगकेंद्राचा विकास करणे	उप वनसंरक्षक, नागपूर विभाग, नागपूर	०.८०
८	बस स्थानक ते ओम गार्डनपर्यंत प्रत्येकी २०० मी. अंतकरावर श्लोक लिहीलेले फलक लावणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	१.८०
९	त्रिविक्रमा पुवळयापासून ते सिंदुर बावडीपर्यंत पोचरस्ता / पायवाट चे बांधकाम तसेच पथदिवे लावून विकास करणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	०.३०
१०	कारपूर बावडी ते डांबर रस्त्यापर्यंत पोचरस्ता / पायवाटचे बांधकाम तसेच पथदिवे लावून विकास करणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	०.५०
११	वाहनतळाचे ठिकाणी सार्वजनिक शौचालये तसेच पिण्याच्या पाणयाची सोय करणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	१.३५
१२	रूद्र-नरसिंह मंदिराच्या जवळील जाग्यावर अस्तित्वात असलेल्या जुने शौचालय जमिन	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	१.३५

	दोस्त करून नविन शौचालयाचे बांधकाम करणे		
१३	गड मंदीराच्या पश्चिमेकडील मोठी गड पायरीच्या बाजूने पोच पायऱ्यांचे बांधकाम करणे, गडमंदीराच्या पायथ्याशी लॅंडस्केपिंग व सौदर्यीकरणे करणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	३.००
१४	मोठी गडपायरी व छोटी गडपायरीचे दुरुस्ती व जिर्णोध्दार करणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	१.२५
१५	केवला नरसिंहा येथील परिसराचे सुशोभिकरण करणे व पर्यावरणभिमुख कामे करणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	१.२५
१६	रूद्रा नरसिंहा येथील परिसराचे सुशोभिकरण करणे व पर्यावरणभिमुख कामे करणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	१.२५
१७	केवल आणि रूद्रा नरसिंहा मंदीराचे संवर्धन तथा जिर्णोध्दार करणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	०.४०
१८	कारपूर बावडी ते गडमंदीर पर्यंत पोचरस्ता/ पायवाटचे बांधकाम करणे	राज्य पुरातत्व विभाग, नागपूर	०.६०
१९	ओम गार्डन या ठिकाणी सार्वजनिक शौचालय तसेच पिण्याच्या पाण्याची सोय करणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	१.५०
२०	यात्रीनिवासाचे बांधकाम करणे	सार्वजनिक बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर	३.१२
	एकूण परिशिष्ट-ब		**२२.०७**
	एकूण परिशिष्ट-अ व ब		**४९.२८**

Satish J Moghe

Digitally signed by Satish J Moghe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6230073c6c2b69dbf76e5210974f85eec0496e45eb4319228925521689fc99e6, cn=Satish J Moghe
Date: 2018.05.21 14:59:02 +05'30'

(स.ज.मोघे)

उपसचिव, महाराष्ट्र शासन